जिल्हा परिषदे अंतर्गत ग्रामपंचायत विभागाकडील ग्रामपंचायत अधिकारी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना एतदर्थ मंडळाची मराठी/हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होणेपासुन सुट देणेबाबत.

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग-२
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि-२/ग्रापं-१/१९८/२०२६
दिनांक:-स्वाक्षरीखाली नमूद केलेप्रमाणे

वाचा:- १. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.हिंभाप११७६/२७ दिनांक १० जुन १९७६

२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.हिंभाप१०८०/१३१/२०, दिनांक २५ मे १९८१

३.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.हिभाप१०८३/१४४८/२०, दिनांक १७ डिसेंबर १९८३

४.महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.हिभाप१०८३/१४४८/२०, दिनांक ०१ डिसेंबर १९८४

५. महाराष्ट्र शासन मराठी भाषा विभाग शासन परिपत्रक क्र. मभाप २०१६/प्र.क्र.१३/ भाषा/२ दिनांक २४ मे २०१६

६. मा. मु.का.अ यांचेकडील अधिकार प्रदान आदेश जा.क्र.साप्रवि/१/रवका/०३१६/ २०३/२०२०दिनांक ०२/०६/२०२०

७. मा. मु.का.अ यांचेकडील अधिकार प्रदान आदेश जा.क्र.साप्रवि/१/रवका/०३१६/ २४१/२०२० दिनांक ०२/०७/२०२०

खालील विवरणपत्र "अ" मधील कर्मचारी हे माध्यमिक शालांत परिक्षेत मराठी व हिंदी भाषा घेवून/भाषा संचालनालय परिक्षा उत्तीर्ण झाले असल्याने, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.मभाप/१०८७/१४/सीआर/२/८७/२०, दिनांक ३०/१२/१९८७ मधील नियम क्र. ४ (४) मधील तरतुदीनुसार व संदर्भ क्र. १ ते ५ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार संदर्भ क्रमांक ६ व ७ नुसार मी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं), जिल्हा परिषद अहिल्यानगर, मला प्रदान केलेल्या अधिकारानुसार खालील ग्रामपंचायत अधिकारी, गट क (वर्ग-३) यांना एतदर्थ मंडळाची मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देत आहे. तसेच वरील सूट ही शासन निर्णय दिनांक १६/११/१९९२ नुसार शासन सेवेत प्रवेश केलेल्या दिनांकापासून/परीक्षा उत्तीर्ण झालेल्या दिनांकापासून भूतलक्षी प्रभावाने देण्यात येत आहे.

विवरणपत्र "अ"

| अ.क्र. | शासकीय कर्मचाऱ्याचे नाव | तालुक्याचे नाव | मराठी भाषा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिल्याचा दिनांक | हिंदी भाषा उत्तीर्ण होण्यापासून सूट दिल्याचा दिनांक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १. | श्री. खंडागळे संतोष हरिभाऊ | नेवासा | २०/०४/१९९९ | २०/०४/१९९९ | |
| २. | श्री. डौले दादासाहेब एकनाथ | नेवासा | १२/०२/१९९१ | १२/०२/१९९१ | |
| ३. | श्री. मोरे देवीदास यशवंत | अहिल्यानगर | १८/०१/१९९१ | १८/०१/१९९१ | |

वरील विवरणपत्र "अ" मधील ग्रामपंचायत अधिकारी यांना मराठी व हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देणेत आलेबाबतची नोंद संबंधितांच्या मुळ सेवापुस्तकांत घेण्यात यावी

सदरचा आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आला असून त्याचा सांकेतांक क्रमांक 202604300600069 असा आहे.

Digitally signed by
DADABHAU NAMDEO GUNJAL
Date: 30-04-2026 13:47:40

उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्रापं)
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,
संबंधित ग्रामपंचायत अधिकारी,
द्वारा गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा, अहिल्यानगर
प्रत:- माहितीस्तव व पुढील कार्यवाहीसाठी
गट विकास अधिकारी, पंचायत समिती नेवासा, अहिल्यानगर